पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

मुंबई ■ वर्ष १ ■ अंक ६ ■ मंगळवार, दि. ९ जून २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पुष्ठे ४

■ RNI No.- MHAR/ 26 /A4530 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# महापालिकेचा कोट्यवधींचा कचरा गेमप्लॅन!




## पैसा जनतेच्या कराचा, कचऱ्यातून समृद्धी कोणाची?




**अकोला:** शहरातील घराघरांच्या उंबरठ्यापासून ते थेट डंपिंग ग्राऊंडपर्यंतच्या कचरा व्यवस्थापनासाठी महापालिकेत सध्या कोट्यवधींच्या नव्या निविदेची (टेंडर) जोरदार चर्चा सुरू आहे. संपूर्ण शहराचा कचरा उचलण्याचे कंत्राट एकाच बड्या एजन्सीला देण्यासाठी प्रशासकीय पातळीवर हालचालींना कमालीचा वेग आला आहे. 'कचऱ्यातून समृद्धीकडे' असे गोंडस नाव या प्रकल्पाला दिले जात असले, तरी 'या समृद्धीच्या नावाखाली नेमका कोणाचा विकास साधला जात आहे?' असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. अकोलेकरांच्या करांवर हा दरोडा तर ठरणार नाही ना अशी विचारणा होत आहे.

नवीन 'सिंगल एजन्सी' पॅटर्न लागू झाल्यास या जुन्या आणि सध्या सुरू असलेल्या ठेक्यांचे काय होणार? ते थेट रद्द केले जाणार की त्यांना मुदतवाढ मिळणार, याबाबत प्रशासनाने अद्याप कोणतीही स्पष्ट भूमिका घेतलेली नाही. शहराच्या गल्लीबोळातून कचरा गोळा करणाऱ्या घंटागाड्या आणि कचरा डंपिंग ग्राऊंडपर्यंत वाहून नेणारे ट्रॅक्टर ठेकेदार हे स्थानिक आहेत. या व्यवसायावर शेकडो स्थानिक मजूर आणि लहान कंत्राटदारांचे कुटुंब अवलंबून आहे. एकाच मोठ्या बाहेरील एजन्सीला संपूर्ण शहराचे काम दिल्यास, या स्थानिक घंटागाडी आणि ट्रॅक्टर ठेकेदारांना घरचा रस्ता दाखवला जाईल का?. अशी विचारणा होत आहे. शहराचा कचरा साफ करणे हा महापालिकेचा मुख्य हेतू आहे की, कचऱ्याच्या नावाखाली स्वतःच्या मर्जीतील ठेकेदारांचे खिसे भरणे हा अजेंडा आहे? जर हा प्रकल्प खरोखरच शहराच्या हिताचा असेल, तर प्रशासनाने स्थानिक ठेकेदारांचे पुनर्वसन आणि मनपा कर्मचाऱ्यांचा वापर यावर अधिकृत खुलासा करावा, अन्यथा अकोलेकर या 'कचरा कोंडी' विरोधात आवाज उठवल्याशिवाय राहणार नाहीत.

### 'पडीक वॉर्ड' संकल्पनेचा पुरता बोजवारा!

शहरातील काही वॉर्डांमध्ये कचऱ्याचे ढीग साचून राहतात, ज्याला 'पडीक वॉर्ड' म्हणून संबोधले जाते. नवीन एजन्सी आल्यानंतर या पडीक वॉर्डांची समस्या सुटणार की केवळ कागदोपत्रीच स्वच्छता दाखवून कोट्यवधींची बिले उचलली जाणार? जर एकाच एजन्सीला मक्तेदारी दिली, तर त्यांच्यावर वॉर्ड पातळीवर नियंत्रण ठेवणे महापालिकेला शक्य होईल का, अशी शंका उपस्थित केली जात आहे.

### महापालिकेची यंत्र सामग्री दान करणार का

महापालिकेकडे स्वतःची स्वच्छता कर्मचाऱ्यांची मोठी फौज आहे. कायमस्वरूपी, पडीक वार्डाचे कंत्राटी आणि ट्रक्टरवरील व इतर रस्ते साफ सफाई व मानधनावरील इतके कर्मचारी उपलब्ध असताना, पुन्हा खाजगीकरणाचा घाट घालून 'सिंगल ठेका पद्धतीने' कोट्यवधी रुपये मोजण्याची गरज काय ? जनतेच्या कराच्या पैशांची उधळपट्टी होते, हा आजवरचा अनुभव आहे. मग तरीही हा हट्ट कोणासाठी? सूत्रांच्या माहितीनुसार, या कोट्यवधींच्या टेंडरच्या अटी आणि शर्ती अशा प्रकारे तयार केल्या जात आहेत, जेणेकरून कोणतीतरी एकच 'ठरलेली' मोठी एजन्सी यामध्ये पात्र ठरेल. विकेंद्रीकरण करण्याऐवजी सर्व अधिकार आणि पैसा एकाच हातात सोपवण्याच्या या 'सेंट्रलाइज्ड' हालचालींमागे मोठे आर्थिक हितसंबंध गुंतल्याची चर्चा आता महापालिकेच्या वर्तुळात रंगू लागली आहे. संबंधित ठेकेदाराला महापालिकेची यंत्र सामग्री, वाहने हे दान दिली जातील काय अशी विचारणा होऊ लागली आहे.

# कोकणात पावसाची दमदार एन्ट्री!




प्रतिनिधी ९ जून

**मुंबई :** कोकणातील अनेक भागात पावसाने चांगली सुरुवात करत दमदार सलामी दिली. रत्नागिरी शहरासह जिल्ह्यातल्या अनेक भागात काल दुपारनंतर सुरू झालेला पाऊस चांगलाच बरसतोय. हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी, तर कधी जोरदार बॅटिंग असं स्वरूप पावसाचं आहे. त्यामुळे शेतकरी वर्गासह जिल्हावासीयांमध्ये समाधान आहे. उकड्यापासून देखील नागरिकांना दिलासा मिळालाय. काल मृग नक्षत्राची सुरुवात झाली आणि त्याच दिवसापासून पावसानं हजेरी लावली. त्यामुळे शेतकरी देखील आता शेतीच्या कामाना सुरुवात करेल.

कोकणानंतर आता मान्सून मुंबईच्या दिशने सरकरला आहे. आज मुंबईत पाऊस बरसण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. महाराष्ट्रात आज (९ जून) वादळी वाऱ्यासह मुसळधार ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम, मुंबई, पुणे आणि नाशिकसह राज्यातील जवळपास २५ ते ३० जिल्ह्यांना पावसाचा 'यलो अलर्ट' जारी केला आहे. मुंबई, ठाणे, पालघर आणि दक्षिण कोकणातील सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह चांगल्या पावसाची शक्यता आहे.

### १२ ते १९ जूनच्या दरम्यान मान्सूनने मराठवाडा व्यापणार

महाराष्ट्रातील काही भागांमध्ये मान्सून सक्रिय झाला असला तरी मराठवाड्यात यंदा मान्सूनचे आगमन उशिराने होण्याची शक्यता असल्याचा अंदाज परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या हवामानशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. कैलास डाखोरे यांनी व्यक्त केला आहे. १२ ते १८ जून दरम्यान मान्सून मराठवाड्यात दाखल होऊन संपूर्ण विभाग व्यापण्यास पोषक परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

### राज्यात सर्वत्र समाधानकारक पावसाची शक्यता कमी

मान्सून दक्षिण कोकणात दाखल झाला असून सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांतील काही भागांमध्ये ९ जूनपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. मात्र त्यानंतर किमान १५ जूनपर्यंत राज्यातील पावसाचा एकंदरीत जोर तसेच मान्सूनच्या प्रगतीचा वेग कमी होण्याची शक्यता हवामानाच्या सध्याच्या अंदाजातून दिसून येत आहे. त्यामुळे या कालावधीत राज्यात सर्वत्र समाधानकारक पावसाची शक्यता कमी आहे. किमान १२ जूनपर्यंत राज्यातील अनेक भागांमध्ये कमाल तापमान सध्याप्रमाणेच उच्च राहण्याची शक्यता आहे. विदर्भ व खानदेशात कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक, तर मराठवाड्यात ३५ ते ४० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याचा अंदाज आहे.

# ओपन स्पेस घोटाळा लपविण्याची तयारी सुरु

## निवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यांना कामावर घेण्याच्या हालचाली

प्रतिनिधी ९ जून

**अकोला:** महापालिकेतील ओपन स्पेस घोटाळ्याची फाईल आर आर सी न्यूज आणि सिटी न्यूज सुपरफास्टच्या हाती कशी लागली याची चौकशी महापालिकेत सुरु झाली आहे. तर हा कोट्यवधीचा ओपन स्पेस घोटाळा दाबण्यासाठी थेट निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्याची रणनिती आखली जात असल्याची धक्कादायक माहिती मिळाली आहे.

महापालिकेत ५० ओपन स्पेस गायब असून हा केवळ ओपन स्पेस गायब असण्याचा घोटाळा नाही तर त्या ओपन स्पेस कोट्यावधीला विकल्याचा महाघोटाळा आहे. या घोटाळ्याच्या चौकशीसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी विशेष चौकशी समिती नेमण्याची गरज आहे. इतकेच नाही तर पन्नास ओपन स्पेस गायब आणि १३० ओपन स्पेसचे नकाशे गायब ची फाईल आर आर सी च्या हातात कशी लागली याचा शोध महापालिकेत घेतला जात आहे. इतक्यावर महापालिकेतील सत्तारुढ थांबले नसून आता ओपन स्पेस घोटाळ्याची व्याप्ती वाढू नये यासाठी थेट निवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यांना पुन्हा नियुक्त करण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहे. त्याची स्वतंत्र नोटशीट चालविली जात आहे. ओपन स्पेस घोटाळा लपविण्यासाठी निवृत्त होणाऱ्या काही अधिकाऱ्यांना पुन्हा महापालिकेत नोकरी देण्याची तयारी सुरु झाल्याची धक्कादायक माहिती मिळाली आहे. यावरुनच या घोटाळ्याची व्याप्ती समोर आली आहे. या विषयावर देखील महापालिका प्रशासन आणि पदाधिकारी यांची चुप्पी का असा प्रश्न उपस्थित होतो. महापालिका आयुक्त, महापौर यांनी या ओपन स्पेस व इतर घोटाळ्यावर पत्रकार परिषद घेत खुलासा करण्याची गरज अकोलेकर व्यक्त करत आहे.


महापालिका हद्दीत 'ओपन स्पेस'चा घोटाळा
50 ओपन स्पेस सापडेना, 130 ओपन स्पेसचे नकाशे गायब
शेतजमीन ते लेआऊट चा प्रवास
अकोल्याच्या हक्काच्या जागांवर हल्ला कोणी मारला?
ते विकासक आणि खरेदीदार कोण
१३० ओपन स्पेसचे नकाशा गायब

# साखरपुड्याला जाताना कारची एसटीला धडक; सहा जण ठार

प्रतिनिधी ९ जून



**जळगाव :** जळगाव जिल्ह्यात अमळनेर-धुळे महामार्गावर मंगळवारी सकाळी तिहेरी अपघात झाला. या भीषण अपघातात सहा जणांचा जागीच मृत्यू झाला असून काही जण जखमी झाले आहेत. कार, एसटी बस आणि दुचाकी यांच्यात झालेल्या या अपघातामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. मृतांमध्ये साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी प्रवास करणाऱ्या गुजरात राज्यातील व्यारा येथील कुटुंबातील सदस्यांचा समावेश असल्याची माहिती आहे.

मंगरूळ गावाजवळ मंगळवारी सकाळी साधारण सात वाजण्याच्या सुमारास हा भीषण अपघात घडला. प्राथमिक माहितीनुसार, अमळनेरहून धुळ्याकडे जाणारी एसटी बस आणि दुचाकी आपल्या मार्गावरुन प्रवास करत असताना धुळ्याकडून भरधाव वेगाने येणाऱ्या कारने नियंत्रण गमावले आणि समोरून जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी प्रचंड होती की दुचाकीचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला, तर कारमधील पाच प्रवाशांचाही घटनास्थळी मृत्यू झाला. त्यामुळे मृतांचा आकडा सहावर पोहोचला आहे. अपघातग्रस्त कारमधील प्रवासी गुजरात राज्यातील व्यारा येथील रहिवासी असल्याची माहिती मिळाली असून ते एका कौटुंबिक साखरपुडा समारंभासाठी अमळनेरकडे येत होते. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतकार्य सुरू केले.

# राम मंदिराच्या दानपेटीतून ५ कोटींची चोरी संजय राऊतांचा भाजपवर गंभीर आरोप

**मुंबई:** अयोध्येतील राम मंदिराच्या दानपेटीतून तब्बल पाच कोटी रुपये चोरीला गेल्याचा गंभीर आरोप शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना राऊत यांनी केंद्र सरकार आणि भारतीय जनता पक्षावर निशाणा साधत, देशातील महत्त्वाच्या संस्थांवर आणि धार्मिक स्थळांच्या व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राम मंदिरासारख्या श्रद्धास्थानातही आर्थिक गैरव्यवहार होत असल्याचा दावा करत त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली.

यावेळी राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपच्या कार्यपद्धतीवरही टीका केली. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी कधीही विरोधी पक्ष फोडण्याचा प्रयत्न केला नाही, मात्र सध्याच्या सत्ताधाऱ्यांकडून विरोधकांना संपवण्याचे राजकारण सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. गेल्या १२ वर्षांत पंतप्रधान मोदी यांनी एकदाही पत्रकार परिषद घेतली नसल्याचा मुद्दा उपस्थित करत, सरकारने आपल्या कारभाराचा हिशोब जनतेसमोर मांडावा, अशी मागणीही राऊत यांनी केली.

राज्यसभा खासदार संजय राऊत यांनी भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांना खुले पत्र लिहून कथित राजेश एक्सपोर्ट्स घोटाळ्याप्रकरणी भूमिका स्पष्ट करण्याचे आव्हान दिले आहे. देशभरात गाजत असलेल्या या प्रकरणात तब्बल १५.१५ लाख कोटी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहाराचा आरोप होत असताना भाजप आणि केंद्र सरकार मौन का बाळगत आहे, असा सवाल राऊत यांनी उपस्थित केला आहे.

पत्रात राऊत यांनी एलआयसीच्या गुंतवणुकीचाही मुद्दा उपस्थित केला आहे. कंपनीच्या शेअरमधील घसरणीमुळे सामान्य गुंतवणूकदारांसह पॉलिसीधारकांच्या पैशांवर परिणाम झाल्याचा दावा त्यांनी केला. तसेच बॅटरी उत्पादनाशी संबंधित इथ्य् योजनेअंतर्गत कंपनीला मिळालेल्या प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवरही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

# राष्ट्रपतींच्या हस्ते अकोल्याच्या शहीद जवानाला मरणोत्तर 'कीर्ती चक्र'

## मोरगाव भाकरेच्या प्रवीण जंजाळच्या पत्नी व आईने स्वीकारला सन्मान

प्रतिनिधी ९ जून



**नवी दिल्ली :** महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यातील मोरगाव भाकरे येथील रहिवासी तथा महार रेजिमेंटच्या पहिल्या बटालियन, राष्ट्रीय रायफल्सचे शिपाई प्रवीण प्रभाकर जंजाळ यांना काश्मीर खोऱ्यात दहशतवाद्यांविरुद्ध लढताना दाखविलेल्या अद्वितीय शौर्य आणि सर्वोच्च बलिदानाबद्दल मरणोत्तर 'कीर्ती चक्र' प्रदान करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रपती भवनात आयोजित विशेष 'रक्षा अलंकरण' सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला. शहीद जवान प्रवीण जंजाळ यांच्या वतीने त्यांच्या पत्नी श्यामबाला जंजाळ आणि आई शाहू प्रभाकर जंजाळ यांनी राष्ट्रपतींच्या हस्ते हा प्रतिष्ठेचा पुरस्कार स्वीकारला.

या सोहळ्यास उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह तसेच अन्य केंद्रीय मंत्री, वरिष्ठ लष्करी अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते. शहीद प्रवीण जंजाळ यांच्या अतुलनीय शौर्य, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रसेवेसाठीच्या सर्वोच्च बलिदानाचा गौरव म्हणून भारत सरकारने त्यांना मरणोत्तर 'कीर्ती चक्र' जाहीर केले होते. या बहुमानामुळे अकोल्याच्या लौकिकात आणखी भर पडली आहे. अकोला जिल्हा देशसेवेतही अव्वल असल्याचे यावरून दिसून येत आहे.

### मातृभूमीच्या रक्षणासाठी प्रवीण जंजाळ शेवटच्या श्वासापर्यंत लढले!

६ जुलै २०२४ रोजी काश्मीर खोऱ्यात सुरू असलेल्या शोध मोहिमेदरम्यान शिपाई प्रवीण जंजाळ आपल्या तुकडीसह कार्यरत होते. मोहिमेदरम्यान काही संशयास्पद हालचाली निदर्शनास येताच त्यांनी तातडीने आपल्या सहकाऱ्यांना सतर्क केले. याचवेळी लपून बसलेल्या दहशतवाद्यांनी पळून जाण्याच्या उद्देशाने अंधाधुंद गोळीबार सुरू केला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही शिपाई जंजाळ यांनी विलक्षण धैर्य, शौर्य आणि प्रसंगावधान दाखवत दहशतवाद्यांचा पाठलाग केला. स्वतःच्या अचूक गोळीबारातून त्यांनी दोन कुख्यात दहशतवाद्यांचा खात्मा केला. चकमकीदरम्यान त्यांच्या डोक्याला गोळी लागून ते गंभीर जखमी झाले होते. मात्र, गंभीर जखमी अवस्थेतही त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत लढा सुरू ठेवला आणि अखेर मातृभूमीच्या रक्षणासाठी वीरमरण पत्करले.

# स्टॉप डायरिया अभियान

## अभियान १६ जून ते ३१ जुलै राबविण्यात येणार

डायरिया (जुलाब) हा लहान मुलांमध्ये आणि बालकांमध्ये आढळणारा एक गंभीर आजार आहे. विशेषतः पावसाळ्यात दूषित पाणी, अस्वच्छता आणि अपुरी स्वच्छता यांमुळे डायरियाचे प्रमाण वाढते. या आजारामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन निर्जलीकरण होऊ शकते, जे जीवघेणे ठरू शकते. त्यामुळे भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने अंतर्गत 'स्टॉप डायरिया अभियान' सुरू केले आहे. हे अभियान १६जुन ते ३१ जुलै राबविण्यात येणार आहे या अभियानाच्या अनुषंगाने एक जून ते १५ जून या कालावधी अभियानाची तयारी करण्यात येत आहे यामध्ये कर्मचारी प्रशिक्षण औषध साठा उपलब्धता सर्वेक्षण प्रती आराखडा लाभार्थी लाईन लिस्ट विशेष मोठ्या प्रमाणावर जनजागृती यामध्ये माहिती नागरिकांना कोण्याकरिता सर्व माध्यमातून मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात येणार आहे सोशल मीडियाचा वापर करून लोकांना माहिती दिली जाणार आहे शाळा विविध संस्था इतर विभागातील अधिकारी कर्मचारी यांचे माध्यमातून प्रसिद्ध करण्यात येणार आहे या अभियानाचा मुख्य उद्देश पाच वर्षांखालील मुलांमधील डायरियामुळे होणारे मृत्यू




शून्यावर आणणे हा आहे.

'स्वच्छता, सुरक्षित पाणी आणि ओआरएस' हे डायरियाविरुद्धचे प्रभावी शस्त्र आहे. प्रत्येक नागरिकाने स्वच्छतेचे नियम पाळून आणि डायरियाबाबत जागरूक राहून या अभियानाला यशस्वी बनवावे. निरोगी बालक हेच देशाचे उज्ज्वल भविष्य आहे; म्हणूनच ङङ'डायरिया रोखा, आरोग्य जपा'ङङ हा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. डॉक्टर विनोद करंजेकर जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी जिल्हा परिषद अकोला

**अभियानाचे महत्त्व**

डायरिया हा टाळता येण्याजोगा आजार आहे. योग्य वेळी उपचार, स्वच्छता आणि जनजागृती यामुळे हजारो बालकांचे प्राण वाचू शकतात. स्टॉप डायरिया अभियानामुळे ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होत आहे आणि स्वच्छ भारताच्या उद्दिष्टालाही बळकटी मिळत आहे.

**अभियानाची उद्दिष्टे**

स्टॉप डायरिया अभियानांतर्गत खालील बाबींवर विशेष भर दिला जातो

१. ओआरएस आणि झिंकचा वापर वाढविणे.
२. स्वच्छ पाणी, हात धुण्याची सवय आणि स्वच्छता यांचा प्रसार करणे.
३. डायरियाची लक्षणे, उपचार आणि प्रतिबंध याबाबत जनजागृती करणे.
४. ङआरोग्य सेवांची गुणवत्ता आणि उपलब्धता वाढविणे.

डायरियापासून बचावाचे उपाय
नेहमी स्वच्छ आणि उकळलेले पाणी पिणे.
जेवणापूर्वी आणि शौचालय वापरल्यानंतर साबणाने हात धुणे.
अन्न झाकून ठेवणे व ताजे अन्न सेवन करणे.
बालकांना स्तनपान देणे.
लसीकरण वेळेवर करून घेणे.
डायरिया झाल्यास त्वरित ओआरएस आणि झिंकचा वापर करणे.

# जगभरातील महासागरांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस



जागतिक महासागर दिन जगभर ८ जून रोजी पाळला जातो. २००८ सालापासून संयुक्त राष्ट्रांनी हा दिवस अधिकृतरीत्या पाळण्याचे ठरविले. त्यापूर्वी १९८२ सालापासून कॅनडामध्ये तो साजरा होत असे. कॅनडा स्थित आंतरराष्ट्रीय संस्था महासागरांच्या संरक्षणासाठी कार्यरत आहे, या संस्थेच्या पुढाकाराने सर्वप्रथम या दिवसाची सुरुवात झाली. वर्ल्ड ओशन नेटवर्क सारख्या विविध संस्था, मत्सयालये, प्राणिशास्त्र विषयात काम करीत असलेल्या संस्था; अशा महत्त्वाच्या संस्था यासाठी एकत्रितपणे योगदान देतात.

जगभरातील महासागरांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा दिवस वार्षिक स्वरूपात साजरा केला जातो. महासागर हे संरक्षिले जावेत आणि नैसर्गिकदृष्ट्या असलेले त्यांचे महत्व जपले जावे, असा यामागे हेतू आहे. प्राणवायू, वातावरणाचे नियमन,अन्नाचा पुरवठा, औषधे आणि अन्य बाबींसाठी महासागरांचे स्थान महत्त्वाचे आहे. या निमित्ताने व्यक्तिगत आणि सामूहिक पातळीवर महासागर रक्षणाची संधी घेतली जाते. महासागर प्रकल्प आणि जागतिक महासागर नेटवर्कने प्रथमच वार्षिक थीम लॉँच केली: 'आमच्या हवामानास मदत करणे / आमच्या महासागराला मदत करणे' कोरल रीफवर विशेष लक्ष केंद्रित करून, आंतरराष्ट्रीय रीफ वर्षासाठी मदत करण्यासाठी. 'एक महासागर, एक हवामान, एक भविष्य' या संवर्धन कृती थीमसह हवामानावर सतत आणि अधिक जोर देते कारण व्यापक मतदान कार्याने असे दिसून आले आहे की लोक हवामान बदल आणि महासागर आरोग्य यांच्यातील संबंध जोडत नाहीत. महासागर प्रकल्प आणि जागतिक महासागर नेटवर्कने डब्ल्यूओडी २०१० साठी ३०० हून अधिक घटनांची नोंद केली, २००९ च्या तुलनेत २६ टक्के वाढ. युनायटेड स्टेट्समधील सहभाग ३२ टक्क्यांनी वाढला (मागील वर्षी २५ राज्यांच्या तुलनेत ३७ राज्यांमधील सहभागासह). बांगलादेश, बेल्जियम, फ्रेंच पॉलिनेशिया, नायजेरिया, घाना, केन्या, माल्टा, मलेशिया, व्हेनेझुएला आणि पोर्तुगाल यासह ४५ देशांनी जागतिक महासागर दिन २०१० मध्ये भाग घेतला. दोन वर्षांच्या फोकससाठी जगभरातील वाढत्या विनंत्यांच्या आधारे, द ओशन प्रोजेक्ट आणि वर्ल्ड ओशन नेटवर्कने 'युथ: द नेक्स्ट वेव्ह फॉर चेंज' लॉँच केले आणि सर्व सहभागी संस्थांना त्यांच्या समुदायांमध्ये आणि देशांमधील तरुणांना शिक्षणासाठी अधिक प्रभावीपणे गुंतवून ठेवण्यासाठी प्रोत्साहित केले. 'मेक अ प्रॉमिस' जागतिक मोहिमेने जागतिक महासागर दिन कार्यक्रमांचा वापर त्यांच्या समुदायातील लोकांना किंवा आमच्या सामायिक महासागरासाठी कृती करण्यासाठी लक्ष्यित प्रेक्षकांना विचारण्याची संधी म्हणून मदत करणाऱ्या संस्थांवर पुन्हा लक्ष केंद्रित केले.

जागतिक जागतिक महासागर दिवस नेटवर्कद्वारे, महासागराला भेडसावणाऱ्या प्रमुख समस्यांवर सहभाग वाढवला आणि 'टूगेदर व्हॅव द प्रोटेक्ट द ओशन!' लॉँच केले. अक्षय ऊर्जा/हवामान बदल, शाश्वत सीफूड/मत्स्यपालन, प्लास्टिक कृती यावरील कृती मार्गदर्शकांसह. जागतिक महासागर दिनाच्या वेबसाइटवर नोंदणीकृत इव्हेंटची संख्या शेकडो आहे. संयुक्त राष्ट्रांनी भागीदारांसह वार्षिक हौशी जागतिक महासागर दिवस महासागर छायाचित्र स्पर्धा सुरू केली.

वार्षिक यूएन थीमशी एकरूपतेसाठी, द ओशन प्रोजेक्टने प्लास्टिक प्रदूषण प्रतिबंध आणि निरोगी जागतिक महासागरासाठी उपायांसाठी मदत करण्यावर पाच वर्षांचा संवर्धन कृती फोकस सुरू केला. जागतिक महासागर दिवस युवा सल्लागार परिषद २०१६ मध्ये सुरू झाली आणि सध्याच्या गटात २२ देशांतील २५ विविध तरुण नेत्यांचा (१५-२३ वयोगटातील) समावेश आहे. २०१६ पासूनचे वार्षिक अहवाल येथे पाहिले जाऊ शकतात.

जागतिक महासागर दिनाची यूएन थीम 'शाश्वत महासागरासाठी नवकल्पना' होती. संवर्धन कृती २०३० (३० बाय ३०) पर्यंत आपल्या ३० टक्के भूमी आणि महासागरांचे संरक्षण करण्यावर लक्ष केंद्रित करा, निसर्गाच्या मोहिमेमध्ये सामील व्हा आणि जागतिक नेत्यांना त्यांच्या देशांना ३० बाय ३० करण्यासाठी वचनबद्ध करण्यासाठी विनंती करण्यासाठी वाढत्या जागतिक चळवळीत सामील व्हा. महासागर प्रकल्प आणि नॅशनल जिओग्राफिकने महासागरासाठी प्रथमच २४-तासांच्या युथ-अ-थॉनचे समन्वय साधले, २४ प्रमुख टाइम झोनमधील २४ सह-यजमानांनी आमच्या सामायिक निळ्या ग्रहाबद्दल अधिक जाणून घेण्याच्या आणि संरक्षित करण्यात मदत करण्याच्या पद्धतींवर चर्चा आणि प्रात्यक्षिक केले. जागतिक महासागर दिवस २०२० चा वार्षिक अहवाल येथे पाहता येईल.

२०२१ मधील जागतिक महासागर दिनाची थीम 'द ओशन: लाईफ अँड लिव्हलीहुड्स' आहे. या वर्षीच्या मोहिमेचे उद्दिष्ट 'महासागराच्या आश्चर्यावर प्रकाश टाकणे आणि ते आपले जीवनस्रोत कसे आहे, मानवतेला आणि पृथ्वीवरील इतर सर्व जीवांना आधार देणे' हे आहे. जागतिक महासागर दिन २०२१ साठी संवर्धन कृती फोकस २०३०पर्यंत आपल्या ३० टक्के भूमी आणि महासागरांचे संरक्षण करण्यावर दुसऱ्या वर्षासाठी लक्ष केंद्रित केले आहे, निसर्गासाठी मोहीम आणि जागतिक नेत्यांना त्यांच्या देशांना वचनबद्ध करण्यासाठी विनंती करण्यासाठी वाढत्या जागतिक चळवळीमध्ये सामील होणे. ३० बाय ३० पर्यंत. वेबसाइटवर १५० देशांमधील १,००० हून अधिक कार्यक्रमांची नोंदणी झाली होती. २०२२ मधील जागतिक महासागर दिनाची थीम 'पुनरुज्जीवन: महासागरासाठी सामूहिक कृती' आहे. हा दिवस जगभरातील शाश्वत विकास उद्दिष्टांच्या अंमलबजावणीस समर्थन देतो आणि महासागरांचे संरक्षण व त्यांच्या संसाधनांच्या शाश्वत व्यवस्थापनामध्ये लोकांची आवड वाढवतो. जागतिक महासागर दिन संयुक्त राष्ट्रांचे सर्व सदस्य देश साजरा करतात.


# सूर्यावरील प्रचंड स्फोटाचा पृथ्वीला तडाखा!

*नवी दिल्ली : एका प्रचंड सौर उद्रेकातून वेगाने पसरणारा कोरोनल मास इजेक्शन पृथ्वीच्या दिशेने येत असून हे कोरोनल मास इजेक्शन आज पृथ्वीवर पोहोचत आहे. परिणामी नासाने जी ३ भूचुंबकीय वादळाचा इशारा दिला असून, उत्तर भारत, युरोप आणि ऑस्ट्रेलियामध्ये अरोरा दिसण्याची शक्यताही वर्तवली आहे. नासाने दिलेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसापासून सूर्य आठवडाभर अस्वस्थ होता. तो भडकत होता, उद्रेक करत होता आणि एकामागून एक चुंबकीय वायूचे ढग सौरमंडळात वेगाने पाठवत होता, जणू काही एखादे शहर न थांबणारे फटाके फोडत आहे, अशी परिस्थिती होती.*

त्यापैकी काही चुंबकीय वायूचे ढग पृथ्वीच्या चुंबकगोलाला चाटून गेलेत. ६ जून, २०२६ च्या सकाळी, हि प्रक्रिया थांबली. 'सक्रिय प्रदेश ४४६१' नावाच्या सौर पृष्ठभागाच्या एका भागातून एक स्फोट झाला, ज्याचे वर्गीकरण एम १.८ फ्लेअर म्हणून केले जाते, जे सौर फ्लेअरच्या मापनश्रेणीत मध्यम श्रेणीत येते. सौर फ्लेअर म्हणजे सूर्याच्या पृष्ठभागावरून होणारा किरणोत्सर्गाचा एक अचानक, तीव्र स्फोट, जो चुंबकीय ऊर्जेच्या स्फोटक उत्सर्जनामुळे होतो. आणि या फ्लेअरने जी गोष्ट सोबत आणली होती, त्यामुळे अंतराळ हवामानशास्त्रज्ञांना दोनदा पाहावे लागले.

दरम्यान, एक गाभ्याचा तंतु, जो घन, चुंबकीय

## भारतात 'ऑरोरा दिसण्याची शक्यता, नासाकडून सतर्कतेचा इशारा



आणि वेगवान होता. आणि थेट पृथ्वीच्या दिशेने येत होता. तो तंतु आता प्रति सेकंद सुमारे १,४०० किलोमीटर वेगाने सौरमंडळाच्या आतील भागातून जात आहे. तो आज पृथ्वीवर पोहोचण्याची शक्यता आहे. स्पेस वेदर प्रेडिक्शन सेंटर, जी अमेरिकेची सूर्यावर चोवीस तास लक्ष ठेवणारी संस्था आहे, तिने जी ३ म्हणजेच तीव्र भूचुंबकीय वादळासाठी सूचना जारी केली आहे.

**फिलामेंट म्हणजे काय?**

विज्ञानापूर्वी, एका प्रतिमेची कल्पना करा. अशा पुलाची कल्पना करा जो पोलाद किंवा दगडाचा नाही, तर विजेचा बनलेला आहे. ते कशावरही तरंगत नाही, पूर्णपणे अदृश्य चुंबकीय क्षेत्रांच्या आधाराने तोलले जाते, आणि त्याच्या आत वायूची एक नदी वाहते, जी सभोवतालच्या वातावरणाच्या मानाने विलक्षण थंड आणि विलक्षण घन आहे. यालाच फिलामेंट म्हणतात. सूर्याचे बाह्य वातावरण, ज्याला कोरोना म्हणतात, ते प्रचंड अदृश्य चुंबकीय क्षेत्रांनी विणलेले आहे, जी सूर्याच्या पृष्ठभागापासून वलयांच्या रूपात बाहेर पसरलेली आहेत. ही क्षेत्रे आयनीकृत वायू असलेल्या घन प्लाझ्माला एका तरंगत्या रचनेत अडकवू शकतात, जी कोणत्याही सहज तर्काने जागेवर स्थिर राहू शकत नाही. आणि काही काळासाठी ती स्थिर राहते.

**भूचुंबकीय वादळ म्हणजे काय? :** भूचुंबकीय वादळ म्हणजे पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्रात होणारा एक तात्पुरता व्यत्यय, जो मॅग्नेटोस्फियरवर सौर ऊर्जेचा प्रचंड प्रवाह आदळल्यामुळे होतो. या संदर्भात नासा सतर्क असून अरोराचे छायाचित्रकार आधीच आपले अलार्म लावत आहेत. अरोरा, जे उत्तर ध्रुवीय प्रकाश म्हणून लोकप्रिय आहेत, हे हिरव्या, जांभळया आणि लाल प्रकाशाचे पडदे आहेत जे पृथ्वीच्या वरच्या वातावरणातील वायूंवर सौर ऊर्जेचे चार्ज केलेले कण आदळल्यावर रात्रीच्या आकाशात लहरींप्रमाणे पसरतात. अगदी शब्दशः सांगायचे तर, ते सूर्याच्या क्रोधाचे सुंदर रूप आहे.

# मोफत नेत्र तपासणी शिबिराचा १६७ रुग्णांनी घेतला लाभ

प्रतिनिधी ९ जून



**हिवरखेड :** स्व. रमेश विठ्ठलराव गावंडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित मोफत नेत्र तपासणी शिबिरामध्ये १६७ रुग्णांनी सहभाग नोंदवला.

आधुनिक संगणकीय मशीनद्वारे आयोजित या शिबिरात नेत्रतज्ज्ञ डॉ. मुक्तार खान यांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक सल्ला व मार्गदर्शन केले. तसेच गरजू नागरिकांसाठी अल्पदरात चष्म्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. हिवरखेड शहरासह परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा त्यांच्या दारात उपलब्ध करून देण्याचा हा प्रयत्न कौतुकास्पद ठरत असून, अनेक ज्येष्ठ नागरिक व गरजू रुग्णांना या शिबिराचा मोठा फायदा झाला. या समाजोपयोगी उपक्रमाचे आयोजन श्री. अनिल भाऊ गावंडे व श्री रमेश भाऊ दुतोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली व वैभव रमेश गावंडे (बांधकाम सभापती, नगरपरिषद हिवरखेड) यांच्या पुढाकारातून करण्यात आले. यावेळी अनिल भाऊ गावंडे, संदीप भाऊ इंगळे, रामदास गावंडे तसेच डॉ. दीपक गावंडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी अशा सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करत आयोजकांचे कौतुक केले.


महाराष्ट्र शासन

**सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला**

**ई-निविदा सूचना ०५/२०२६-२०२७**

जावक क्रमांक 3488/ईनिसु-०५/ निलि /२०२६ / दिनांक 02/06/2026

email.akola.ee@mahapwd.gov.in Phone No ०७२४- २४३५१९५

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला या महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील काम क्र. १ ते १५ निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन मागविण्यात येत आहे) निविदेतील अटी व शर्ती यांची पूर्तता करतील, असे सक्षम कंत्राटदार तसेच काम क्र. १ करीता आंतरराष्ट्रीय कंपनी यांची उप कंपनी भारतीय असल्यास निविदा स्पर्धेमध्ये भाग घेऊ शकतील. कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे अटी व शर्तींच्या अधीन राहून निविदेमध्ये सहभाग नोंदवू शकतील. ई-निविदा संकेतस्थळ https://www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची किंमत (रुपये) | संवर्ग |
|---|---|---|---|
| १ | क्रिडा संकुल अकोला येथे ऑलिम्पिक दर्जाचे जलतरण तलाव परिसरात प्रेक्षकांसाठी गॅलरी, पार्कींग आणि सिमेंट रस्ता बांधकाम करणे | २९०६७९५५ | पात्र |
| २ | अकोला जिल्ह्यातील तालुका बाळापूर येथे न्यायालयीन इमारती मध्ये लॉयर्स हॉलचे बांधकाम करणे | १०८५५४९९ | पात्र |
| ३ | अकोला येथे वन भवन इमारतीला आवारभितीचे बांधकाम व डांबरी रस्ता तयार करणे | ७६४३९२७ | पात्र |
| ४ | अकोला येथे वन विभाग कार्यालय परिसरात इन्सपेक्ट हटचे बांधकाम करणे | ७१२००८० | पात्र |
| ५ | अकोला जिल्ह्यातील अंबाशी गावाजवळ प्रजिमा-२२ चे मजबुतीकरण करणे ता. पातूर व मलकापूर गावाजवळ प्रजिमा- २२ चे मजबुतीकरण करणे ता. पातूर | ३९३६१८४ | पात्र |
| ६ | अकोला येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे शासकीय निवासस्थानाच्या जवळ अस्थमा व क्ष किरण वॉर्डाला आवारभिंतीचे बांधकाम करणे | २३३६८४७ | पात्र |
| ७ | अकोला जिल्ह्यातील राजंदा येथे ग्रामपंचायत जागेत सभागृह बांधणे ता. बार्शिटाकळी | १२३५०२६ | पात्र |
| ८ | अकोला जिल्ह्यातील मांगुळ येथे दत्त मंदीरा जवळ ग्रामपंचायत जागेत सभागृह बांधणे ता. बार्शिटाकळी | १२३५०२५ | पात्र |
| ९ | अकोला जिल्ह्यातील मौजे नवेगांव येथे सांस्कृतिक संकुलाचे बांधकाम करणे ता. पातूर. | ३५०४७३१ | सुबेअ |
| १० | अकोला जिल्ह्यातील जलालाबाद येथे गजानन महाराज मंदीरा जवळ ग्रामपंचायत जागेत सभामंडप बांधणे ता. बार्शिटाकळी | १६६४६०८ | सुबेअ |
| ११ | अकोला येथे सा.बां. विभाग विश्राम भवन सुट क्रमांक ५,६,७, व ८ चे नूतनीकरण करणे | ४१२२५५२ | मकाससं |
| १२ | अकोला येथे सैनिक मुलांचे वस्तीगृहाचे नुतनीकरण व बळकटीकरण करणे | ३९७२७२३ | मकाससं |
| १३ | अकोला येथे सैनिक मुलींचे वस्तीगृहाचे नुतनीकरण व बळकटीकरण करणे | ३८९०७४६ | मकाससं |
| १४ | अकोला येथे न्यायरत्न जिल्हा व सत्र न्यायाधिश निवासस्थानाची विशेष दुरुस्ती करणे | २६६१८९८ | मकाससं |
| १५ | अकोला जिल्ह्यातील वरणगाव येथे ग्रामपंचायत जागेत सभामंडप बांधणे ता. पातूर | १२३०९१४ | मकाससं |


अटी व शर्ती - १. सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदा डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
२. ई-निविदा काम क्र. १ ते १५ कामांची ई - निविदा दिनांक ०९/०६/२०२६ रोजी १०.०० पासुन दिनांक १६.०६.२०२६ रोजी १८.०० वाजेपर्यंत डाऊनलोड व हॅश सबमीशन करता येतील. ई निविदा कामाची ई-निविदा उघडण्याची दिनांक १८.०६.२०२६ ( पुढील ई-निविदा विषयक कार्यक्रम ऑनलाईनप्रमाणे)
३. वरील काम क्र. १ कामाची निविदा पूर्व बैठक दिनांक १०/०६/२०२६ वेळ १२.०० वा. मा. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला येथे आयोजित करण्यात येईल.
४. वरील काम क्र. १ ते २ कामांची ई-निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला येथे उघडण्यात येतील.
४. खालील संकेत स्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध राहिल. http://mahatenders.gov.in
५. इतर अटी व शर्ती ई निविदा नमुन्यामध्ये उपलब्ध आहेत. कोणत्याही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न सांगता अस्विकृत करण्यांचे सर्व अधिकार सक्षम प्राधिकरणाकडे राखून ठेवण्यात आले आहे.
६. वरील कामांसाठी कंत्राटदाराने त्यांचे अभियंत्यासह मोक्याची जागेची पाहणी करून ई-निविदा सादर करावी व कोणतेही अतिरिक्त दावे स्वीकारल्या जाणार नाही.
७. ऑनलाईन वेळापत्रक लागू व अंतिम राहील.

(प्रसाद पाटील)
कार्यकारी अभियंता
सा.बां. विभाग अकोला

DGIPR-2026-27/1048


## दिन विशेष

# वसंत देसाई : एक सर्जनशील संगीतकार



आज जयंती

वसंत देसाई यांचा जन्म ९ जून १०१२ मध्ये सोनावडे जि. सावंतवाडी येथे झाला. ते मराठी तसेच अन्य भारतीय चित्रपटांस संगीत देणारे मराठी संगीतकार होते. त्यांनी दिलेल्या चालींमुळे त्यांचे नाव भारतात आणि परदेशांत अजरामर झाले आहे.

घरात सांज-सकाळ होणाऱ्या आणि गाव देवळात होणाऱ्या भजन-कीर्तनांमुळे छोट्या वसंताला संगीतात रुची निर्माण झाली. त्यातच गावात एक सर्कस आली; ती पाहिल्यावर त्यांना सर्कशीत कामे करून लोकांना आनंद द्यावे असे वाटू लागले. त्यासाठी त्यांनी गाव सोडले व ते कोल्हापूरला आले. सर्कशीत काम मिळाले नाही पण प्रभात फिल्म कंपनीत नोकरी मिळाली. त्यावेळी अयोध्येचा राजा या चित्रपटाची निर्मिती होत होती; गोविंदराव टेंबे संगीत देत होते. वसंत देसाईंनी त्यांचा साहाय्यक होण्याचे पत्करले. पुढे कंपनी कोल्हापूरहून पुण्याला आल्यावर वसंत देसाईही पुण्यात आले आणि त्यांना मास्तर कृष्णराव व केशवराव भोळे या दोन दिग्गज संगीतकारांचा सहवास लाभला. तेथेच वसंतराव संगीतातले स्वर, तान, फिरकी, आणि रसानुकृत भावदर्शन शिकले.

इ.स. १९४३ मध्ये वसंत देसाई यांनी राजकमल कलामंदिराच्या शकुंतला या पहिल्या चित्रपटाला स्वतंत्रपणे संगीत दिले. त्यांची ही संगीत कारकीर्द पुढे तीस वर्षे चालूच राहिली. जवळजवळ ६५ हिंदी-मराठी चित्रपटांचे ते संगीत दिग्दर्शक होते. चित्रपट-नाटकांशिवाय त्यांनी बालगीतांना आणि समरगीतांनाही संगीत दिले. त्यांच्या 'ए मालिक तेरे बंदे हम' या गीताला पाकिस्तानात राष्ट्रगीताचा दर्जा मिळाला. १९६२ च्या चीन युद्धाच्या वेळचे 'जिंकू किंवा मरू' या ग.दि. माडगुळकरांच्या गीताला त्यांनीच चाल लावली होती.

हिंदी चित्रपट संगीतकारांचा विचार करताना, बरेचसे संगीतकार हिंदी चित्रपटांपुरते किंवा हिंदी भाषिक गीतांपुरते आपले अस्तित्व ठेवतात. अर्थात ही त्यांची मर्यादा असे म्हणता येणार नाही पण त्यांनी हिंदी चित्रपट हेच आपले ध्येय ठेवले. या मताला सणसणीत अपवाद म्हणून वसंत देसाई यांचे नाव अवश्यमेव घ्यावेच लागेल. कोकणपट्टीतील सावंतवाडी जवळील सोनवड गावी जन्म. हा तपशील जरा महत्वाचा म्हणायला लागेल कारण हा परिसर धर्म आणि लोकसंगीताने गाजणारा आहे. याचा प्रभाव आणि परिणाम वसंत देसाईंवर नक्कीच झाला असणार. संगीतात लहानपणापासून अतोनात रस, याची परिणीती, उस्ताद इनायत खान आणि डागर बंधू, यांच्याकडून शास्त्रोक्त संगीताची तालीम घेतली. वसंत देसाईंच्या स्वररचनेवर रागसंगीताचा फार प्रभाव आहे, याचे मूळ इथे सापडू शकते. पुढे तरुण वयात प्रभात कंपनीत, गोविंदराव टेबे यांच्या हातखिळी सहाय्यक म्हणून काम करण्याची संधी मिळाली आणि प्रभात कंपनीत स्थिरावले. इथे त्यांना व्ही. शांताराम भेटले आणि नंतर जेंव्हा व्ही. शांतारामांनी प्रभातपासून वेगळे व्हायचा निर्णय घेतला तेंव्हा वसंत देसाई यांना तिथे भरपूर संधी मिळाल्या. या दोघांना प्रभातचा वारसा मिळाला होता, हे मुद्दामहून ध्यानात ठेवावे लागेल. समान विचार आणि ध्येये यांचा परिणाम दोघांच्याही कार्यात दिसला. राजकमल बरोबर त्यांनी दीर्घकाळ काम केले. वास्तववादी चित्रपटनिर्मितीत ज्याचा उद्भव होतो त्या संगीतावरच भर असल्याकारणाने विविध आणि वास्तव ध्वनी-उगम वापरण्यावर देसाई यांचा कटाक्ष होता. उदाहरणार्थ, ' डॉ आँखे बारा हाथ' या चित्रपटातील 'सैय्या झुठो का बडा सरताज निकला' या गाण्यात 'रावणहथ्था' या लोकवाद्याचा समर्पक उपयोग!! तसेच याच चित्रपटातील 'ऐ मालिक तेरे बंदे हम' या गाण्यात योजलेला लयबंध वाऱ्याने उघडझाप करणाऱ्या खिडकीने पुरवला जातो. वसंत देसाईंच्या रचनांत थोडाफार नाट्यगीतांचा गंध राहिलापण हे थोडे अपेक्षित असेच म्हणावे लागेल. याशिवाय असे जाणवते, पारंपरिक सांगीत चलने आणि चाली यांच्या अंगभूत संगीत आकर्षणशक्तीवर विश्वास असल्या कारणाने त्या जशाच्या तशा व परिणामकारकतेने वापरण्यात त्यांनी मागेपुढे पहिले नाही. याचाही संबंध मराठी नाट्यसंगीताशी असलेल्या त्यांच्या जवळच्या नात्याचा असावा. हिंदुस्थानी कलासंगीताचा आपण यथातथ्य वापर करतो असा मराठी नाट्यसंगीतपरंपरेचा दावा बऱ्याच अंशी सार्थ असतो, हा दृष्टिकोन इथे महत्वाचा आहे. या परंपरेचा आणि देसाई यांचाही कलासंगीतास पातळ करून वापरण्यावर भरवसा नव्हता. 'झनक झनक पायल बाजे' या चित्रपटातील 'नैन सो नैन' या गाण्यासाठी 'मालगुंजी' रागाचा आधार घेतला आहे आणि हा राग प्रेम-प्रणय इत्यादींसाठी वारंवार वापरलेल्या बागेश्रीपासून नाजूक अंतर राखून असतो म्हणजे तास ठेवावा लागतो. याच चित्रपटातील, भारताच्या अनेक प्रांतांत प्रचलित 'बारमासा' या पारंपरिक लोकगीतप्रकारच्या धर्तीवर त्यांनी ऋतूवर्णनपर पद्ये योजली आहेत. या रचनांना गीतांचे स्वरूप न देता केवळ चाली ठेवण्यात देसाई यांनी परंपरेत राहून थोडा बदल करण्याच्या रचनापद्धतीचा अवलंब केला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
मंगळवार, दि. ९ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# एस.आर.पाटील पाडण्यासाठी पुन्हा मागितला पोलिस बंदोबस्त...

प्रतिनिधी ९ जून

**अकोला :** विदर्भ ग्रामीण शिक्षण संस्थेचे सव्वातीनशे चौरस मीटर अनधिकृत बांधकाम पाडण्याचा ठेका दिला गेला. पण, ते अनधिकृत बांधकाम का पाडले नाही असा प्रश्न आता विचारला जात आहे. या विषयावर महापालिकेचे पदाधिकारी यांनी चुप्पी साधली आहे. याचचा अर्थ वरिष्ठ स्तरावर अनधिकृत बांधकामे वाचविण्याच्या हालचालींना वेग आला आहे. तर झोन अधिकारी देविदास निकाळजे यांनी पुन्हा पोलिसांना बंदोबस्त मागितला असून त्यांनी बंदोबस्त दिल्यानंतर हे अनधिकृत बांधकाम पाडले जाईल असे त्यांनी स्पष्ट केले.




गेल्या काही वर्षांपासून विशेषतः मागील वर्षात केवळ शैक्षणिक सत्र सुरु आहे या कारणासाठी एस आर पाटील महाविद्यालयाचे अतिक्रमण पाडणे थांबले होते. पण, शैक्षणिक सत्र संपले, कारवाईचा आदेश झाला, कंत्राटदाराला काम दिले गेले. पण,४ जुन रोजी एस. आर. पाटील महाविद्यालयाचे अतिक्रमण,अनधिकृत बांधकाम मात्र पाडले गेले नाही. २४ तासांची नोटीस बजावून मनपाची फौज सज्ज झाली होती.

पण, कारवाई टाळल्या गेली. सहकार नगरातील हरिश- अश्विन कॉलनी येथील एस आर पाटील महाविद्यालयाच्या अनधिकृत बांधकाम पाडण्यास कोण्या पदाधिकाऱ्याने नकार दिला अशी विचारणा होत आहे. अकोला नगर परिषदेने विदर्भ ग्रामीण शिक्षण संस्थेला केवळ १४१ चौ.मी.बांधकाम मंजुरी दिली होती. पण, त्यांनी मंजुरीपेक्षा ३२४ चौ.मी.एवढे अतिरिक्त व अनधिकृत बांधकाम केल्याचे महापालिकेने सिध्द केले आहे. भुखंडावर रहिवासी भागासाठी असलेले आरक्षण असताना शाळा उभारण्यात आली. हे अतिक्रमण पाडण्यासाठी पुन्हा एकदा झोन अधिकाऱ्यांनी तयारी दाखविली आहे. त्यांनी बंदोबस्तासाठी खदान पोलिसांना पत्र लिहिल्याचे देखील स्पष्ट केले आहे. आता पोलिस च्या कोर्टात हा विषय गेला असून अवैध व अतिक्रमण पाडण्यासाठी बंदोबस्त मिळतो की नाही.

### पोलिस बंदोबस्त मिळणार की नाही

खदान पोलिस स्टेशन हद्दीत हे अतिक्रमण पाडण्याचे काम आहे. त्यासाठी खुप मोठा पोलिस बंदोबस्त लागणार नाही. खदान पोलिस खुप कामात असतील तर शहरातील इतर ठाण्यातील पोलिस देत पोलिस बंदोबस्त दिला जाऊ शकतो. फक्त यंत्रणेची इच्छा पाहिजे. असे मत अकोलेकर व्यक्त करत आहे. पोलिसांना अनधिकृत, अवैध इमारत पाडण्यासाठी बंदोबस्त द्यायचा नसेल तर काहीच होऊ शकत नाही असा कयास अकोलेकर लावत आहे.

# गॅस दरवाढीने बिघडले अनेक कुटुंबांचे गणित

◆ घरगुती खर्च वाढत असल्याच्या गृहिणींच्या तक्रारी

प्रतिनिधी ९ जून

**अकोला :** घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात तीन महिन्यात दुसऱ्यांदा वाढ झाली आहे. सात जून रोजी झालेल्या २९ रुपयाच्या दरवाढीनंतर घरगुती वापराचे सिलेंडर शहरात ९६२ रुपयांना मिळू लागले आहे. मार्च महिन्यापासून घरगुती सिलेंडरचे दर वाढतच आहेत. गॅसच्या दरवाढीमुळे अनेक कुटुंबाचे गणित बिघडू लागले आहे. पेट्रोल डिझेलच्या दरवाढीच्या पाठोपाठ सिलेंडरही महाग झाल्यामुळे घरगुती खर्च वाढत असल्याची प्रतिक्रिया गृहिणींमधून व्यक्त केली जात आहे. गॅस सिलेंडर आणि पेट्रोल व डिझेलचे भाव वाढल्याने गेल्या काही महिन्यांपासून खाद्यपदार्थ, भाजीपाला, आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीमध्ये वाढ होत असल्याने सर्वसामान्यांचे जगणे मुश्किल झाले आहे. तीन महिन्यात झालेल्या एकूण ८९ रुपयाच्या दरवाढीमुळे सर्वसामान्यांच्या घराच्या बजेटवर थेट परिणाम होत आहे. कमी उत्पन्नात खर्चात काटकसर कुठे करावी असा प्रश्नही काहीजणांच्या समोर उभा राहिला आहे. विशेषता स्वयंपाकासाठी पूर्णपणे गॅसवर अवलंबून असलेल्या कुटुंबांना या दरवाढीचा मोठा फटका बसत आहे. त्यात इंडक्शन वापरावे तर विजेचे बिल परवडत नाही अशी स्थिती शहरी भागात राहणाऱ्या कुटुंबांची झाली आहे.

### बुकिंग केल्यावरही लवकर मिळत नाही गॅस

◆गॅस कंपन्यांनी सिलेंडर बुकिंग साठी लागू केलेली लॉक प्रणाली अद्याप कायम आहे सिलेंडरची डिलिव्हरी झाल्यानंतर २५ दिवसांनी पुढील सिलेंडरची मागणी नोंदवता येते ओटीपी शिवाय सिलेंडर मिळत नाही असे असतानाही बुकिंग केल्यावर अनेकांना वेळेवर सिलेंडर मिळत नसल्याच्या तक्रारी येत आहेत.

### मोदी सरकारने एलपीजीचे दर कमी करावेत

◆मोदी सरकारने तातडीने घरगुती एलपीजीचे दर कमी करावेत दरवाढीमुळे अतिरिक्त खर्चाचा बोजा वाढत आहे महागाईने जगणे मुश्किल झाले आहे

**सौ गायत्री खरसाने** गृहिणी

◆पेट्रोल डिझेलच्या किमती वाढल्याने महिन्याचा किराणा खर्च ३०० ते ४०० रुपयांनी वाढला आहे आता गॅस सिलेंडरचे दर वाढल्याने सर्वसामान्यांचे आर्थिक बजेट बिघडत आहे.

**ज्ञानेश्वरी गावंडे** युवती

# मुख्य रस्त्यावरील अतिक्रमणावर कारवाई

प्रतिनिधी ९ जून

**अकोला :** महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत असलेल्या बहुतांश मुख्य रस्त्यालगत स्थायी/अस्थायी स्वरुपाचे अतिक्रमण झाले असल्याबाबत निदर्शनास आले आहे. सदरहू अतिक्रमणामुळे मुख्य रस्त्यावरील रहदारीस अडथळा निर्माण होऊन मोठ्या प्रमाणात वाहतुकीस कोंडी निर्माण होत असून मनपा आयुक्त यांच्या आदेशान्वये तसेच मनपा सहा.आयुक्त गणेश शहाणे यांच्या मार्गदर्शनात ८ जून रोजी मनपा क्षेत्रातील उत्तर झोन स्थित असलेल्या खुले नाट्य गृह ते इंदौर गल्ली ते फतेह चौक पर्यंतचे वाहतुकीस अडथळे निर्माण करणा-या कच्चे व पक्क्या स्वरूपाचे अतिक्रमणावर मनपा अतिक्रमण निर्मुलन पथकाव्दारे पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

या कारवाईत सिटी कोतवाली पोलीस स्टेशनचे ठाणेदार संजय गवई, सहा.अतिक्रमण अधिकारी प्रवीण मिश्रा, चंद्रशेखर इंगळे, कनिष्ठ अभियंता नरेश कोपेकर, राहूल राऊत, संतोश भगत, रूपेश इंगळे, गुलाम मुस?तफा, बंटी सावंग, कुणाल साहू, अमित सरदार यांचेसह पोलीस कर्मचा-यांची उपस्थिती होती.



# राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाने जप्त केला 3 लाख 14 हजारांचा मुद्देमाल

प्रतिनिधी ९ जून

◆ २९ मे ते ७ जूनदरम्यान राबविली मोहीम

**अकोला :** राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाने जिल्ह्यात हातभट्ट्यांविरूद्ध मोहिम राबवून ३ लाख १४ हजार रू. चा मुद्देमाल जप्त केला. मेथेनॉल मिश्रित विषारी मद्य प्राशनामुळे सुमारे २० नागरिकांचा मृत्यू झाल्याची गंभीर घटना नुकतीच पुण्यात घडली. अशा प्रकारच्या घटना भविष्यात घडू नयेत, यासाठी राज्य उत्पादन शुल्क जिल्हा अधीक्षक सीमा झावरे यांच्या नेतृत्वात २९ मे ते दि.७ जून दरम्यान मोहिम राबविण्यात आली.

कार्यक्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली वेगवेगळी पथके तयार करून अनधिकृत हातभट्टी विरोधात वेगवेगळ्या ठिकाणी कारवाई करण्यात आली. यामध्ये वेगवेगळ्या पथकांच्या नेतृत्वात खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली. एकूण गुन्हे प्रकरणांत ३ लक्ष १४ हजार ७२० रू. चा मुद्देमाल जप्त झाला. आरोपींवर महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ अंतर्गत कलम ६५ ई आणि कलम ६५ एफ अंतर्गत कारवाई करण्यात आली. हातभट्टीसाठी वापरण्यात येत असलेला सडवा व वापरण्यात येत असलेले इतर साहित्य जागीच नष्ट करुन राज्य उत्पादन शुल्क विभाग अकोला मार्फत अनधिकृत हातभट्टी मद्यसेवनाने होणाऱ्या नुकसानांबद्दल नागरीकांमध्ये जनजागृती करण्यात आली. तसेच अवैध मद्यसेवनाने आरोग्यावर आणि समाजमनावर होत असलेल्या विपरीत परिणामांबद्दल नागरीकांना राज्य उत्पादन शुल्क विभाग अकोला मार्फत माहीती देण्यात आली.

# विद्युत केबलची चोरी; गुन्हा दाखल

**नांदुरा:** तालुक्यातील अहमदपूर शिवारात अज्ञात चोरट्यांनी विविध शेतांमधील जुनी वापरातील विद्युत केबल तोडून चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी नांदुरा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध ७ जून रोजी गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इरफान खान शमशेर खान (४७, रा. सैयद जमालपुरा, नांदुरा) यांनी याबाबत तक्रार दिली. ७ जूनपूर्वी अहमदपूर शिवारातील विविध शेतांमधून अज्ञात चोरट्यांनी एकूण ४४५ फूट केबल तोडून चोरून नेली.

या चोरीत इरफान खान यांच्या गट क्रमांक ५७ मधील शेतातून १२० फूट केबल, शेख अकबर शेख मुन्तेजर यांच्या शेतातून २० फूट, अब्दुल रफिक अब्दुल सत्तार यांच्या शेतातून १२० फूट, संजय महादेव राखोंडे यांच्या शेतातून ७५ फूट,

बिस्मिल्ला खान अब्दुल्ला खान यांच्या शेतातून २५ फूट, सैय्यद रहीम सैय्यद काजू यांच्या शेतातून २५ फूट तसेच शेख सरदार शेख अमीर आणि गणेश शंकर नाफडे यांच्या शेतातून प्रत्येकी ३० फूट

केबल चोरीला गेली आहे. चोरीस गेलेल्या केबलची एकूण किंमत सुमारे २० हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी नांदुरा पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास गजानन इंगळे करीत आहेत.

# गुणवंत व्यक्तींच्या कर्तृत्वामुळे विकास कार्यास मोठा हातभार : ना. आकाश फुंडकर

प्रतिनिधी ९ जून

**अमरावती :** समाजातील गुणवंतांच्या कर्तृत्वामुळे विकास कार्यास मोठा हातभार लागत असतो. त्यामुळे अशा व्यक्तिमत्त्वांचा गौरव करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिलीच पाहिजे, असे प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर यांनी केले. दर्यापूर तालुक्यातील शिंगणापूर येथील काळा मारुती संस्थांन मध्ये आयोजित सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. अकोल्याच्या बी. जी. ई. सोसायटीचे अध्यक्ष ?ड. मोतीसिंग मोहता, अकोला वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. जयराज कोरपे, 'वत्सल' हॉस्पिटलचे संचालक डॉ. नरेंद्र भागवत, अकोला अर्बन बँकेचे माजी अध्यक्ष रामेश्वर फुंडकर, उद्योगपती रमेश वानखडे यांचा आकाश फुंडकर व अतिथींच्या हस्ते शाल, श्रीफळ व मारुतीरायांचा फोटो देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार गजाननराव दाळु गुरुजी तर प्रमुख अतिथी म्हणून आमदार प्रतापराव अरसड, माजी आमदार नारायणराव गव्हाणकर, बबनराव चौधरी,




वसंतराव खोटरे, काळा मारुती संस्थांचे अध्यक्ष प्रदीप देशमुख, उपाध्यक्ष रावसाहेब भटकर उपस्थित होते. याप्रसंगी विचार मंचावर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रमोद देंडवे, दत्तात्रय नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष जगदीश मुरूमकार, आयोजन समितीचे अध्यक्ष प्रा. राहुल खंडारे, कार्यक्रमाचे आयोजक अण्णाभाऊ टाले, नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड चे अध्यक्ष प्रदीप खाडे, छावा संघटनेचे जिल्हाप्रमुख शंकरराव वाकोडे, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष किशोर भाऊ मांगटे, भाजपा नेते बाळासाहेब हिंगणीकर, भाजपाचे अमरावती जिल्हा उपाध्यक्ष मदन भाऊ बायस्कर, भाजप नेते संजय चौधरी, पाटील समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा वैशाली बहाकार, सचिव ॲड. दिपाली जानोरकर, नगरसेविका उषाताई विरक, शिवसेना महिला आघाडीच्या देवश्री ठाकरे, जिल्हा बँकेचे संचालक डॉ. अभिषेक तिडके, नेत्रतज्ञ डॉ. सुनील चव्हाण, नगरसेवक आशिष पवित्रकार प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रारंभी दीप प्रज्वलन व हनुमंतरायांच्या फोटोचे पूजन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. जयश्री भटकर, वंदना बनसोड, अंजली बेलसरे, रेखा खलोकर यांनी स्वागत गीत सादर केले सत्कार समितीचे अध्यक्ष प्रा. राहुल खंडारे, आयोजक अण्णाभाऊ टाले, ओमप्रकाश दाळु, मुकेश गव्हाणकर, विनोद अंबुसकर, ॲड. पप्पू मोरवाल, आशिष पवित्रकार, ॲड. राहुल इंगळे, ॲड. विलास बेले, नगरसेवक अभय खुमकर, विजय इंगळे, पंकज देशमुख यांनी अतिथींचे स्वागत केले. ना. आकाश फुंडकर यांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजक अण्णाभाऊ टाले यांचे हस्ते, गजाननराव दाळु गुरूजी यांचा सत्कार प्रा. राहुल खंडारे यांचे हस्ते तर आमदार प्रतापराव अडसड यांचा सत्कार ओमप्रकाश दाळु यांचे हस्ते करण्यात आला. याप्रसंगी ॅन्ड. मोतीसिंग मोहता, गजाननराव दाळु गुरुजी, प्रदीप देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. राहुल खंडारे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन प्रदीप खाडे यांनी तर आभार प्रदर्शन मुकेश गव्हाणकर यांनी केले.

# आता दाढी कटिंग साठी मोजावे लागणार ज्यादा दाम

प्रतिनिधी ९ जून

◆ सलून सेवा २० टक्के होणार महाग

**अकोला :** अमेरिका इजराइल इराण युद्ध सुरू झाल्यापासून इंधनापासून ते खाद्यपदार्थांपर्यंत महागाईची झळ पोहोचली आहे. गॅस, पेट्रोल, डिझेल, खाद्यपदार्थ, प्रवास खर्च आदींमध्ये मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे जगणे मुश्किल झाले आहे. अशातच आता सलून चालकांनी भाव वाढवल्याने दाढी कटिंग करने सुद्धा महाग होणार आहे. महाराष्ट्र नाभिक महामंडळाने सलून सेवांच्या दरात २०ऽदरवाढ केल्याचे जाहीर केले आहे. याबाबत महामंडळाने प्रसिद्धिस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की नाभिक समाज आज स्वतःच्या अस्तित्वासाठी संघर्ष करत आहे, सलून व्यवसाय गेल्या काही वर्षात वाढती महागाई, आर्थिक मंदी, आणि वाढत्या खर्चाच्या ओझ्याखाली अक्षरशः दबला गेला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नाभिक महामंडळाने राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील सलून सेवांच्या दरांमध्ये २० टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला



### सलून चे भाव वाढण्यामागे युद्धाचे कारण

अमेरिका इराण युद्धाची ढग थेट सलून दुकानापर्यंत पोहोचली आहे. इंधन दराच्या वाढीचा फटका सलून व्यवसायाला सुद्धा बसला आहे. खर्च वाढल्यामुळे बाजारातील प्रत्येक वस्तू महाग झाली आहे. सलून व्यवसायासाठी लागणारे शाम्पू, हेअर कलर, ब्लीच, फेशियल, क्रीम, जेल, वॅक्स, डिस्पोजेबल वस्तू, टॉवेल धुण्याचे साहित्य, निर्जंतुकीकरणासाठी लागणारे पदार्थ, आणि इतर अनेक वस्तू पेट्रो केमिकल उद्योगाशी संबंधित आहेत. त्यामुळे इंधन दरवाढीचा थेट परिणाम या वस्तूंवर झाला आहे. लॉरियल, वेला, श्वाड्र्सकॉफ, गोदरेज यासारख्या नामांकित देशी-विदेशी कंपन्यांनी गेल्या काही काळात त्यांच्या उत्पादनांच्या किमतीमध्ये मोठी वाढ केली आहे. त्यामुळे सलून च्या सेवांमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने आता दाढी कटिंग करण्यासाठी नागरिकांना आता खिसा सैल करावा लागणार आहे.

# 'पंतप्रधानपदाचा चेहरा जाहीर करा, समन्वयकही ठरवा'


**मुंबई:** आगामी लोकसभा निवडणुकांच्या तयारीला लागलेल्या इंडिया आघाडीत नेतृत्वाच्या मुद्द्यावरून नवी चर्चा सुरू झाली आहे. विरोधी पक्षांच्या महत्त्वाच्या बैठकीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आघाडीसमोर दोन महत्त्वाच्या मागण्या ठेवल्याची माहिती समोर आली आहे. इंडिया आघाडीने तातडीने एक सक्षम समन्वयक नियुक्त करावा आणि जनतेसमोर पंतप्रधानपदाचा चेहरा स्पष्ट करावा, अशी भूमिका ठाकरे यांनी मांडल्याचे सूत्रांकडून सांगितले जात आहे. या भूमिकेमुळे विरोधी पक्षांच्या आघाडीत नेतृत्वाच्या प्रश्नावर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली असून आगामी राजकीय रणनीतीवर त्याचे परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), शिवसेना (उद्धव ठाकरे गट), द्रमुक, समाजवादी पक्ष, आम आदमी पक्ष यांच्यासह अनेक पक्ष या आघाडीचा भाग आहेत. मात्र, स्थापना होऊन अनेक महिने उलटल्यानंतरही आघाडीचा अधिकृत समन्वयक किंवा राष्ट्रीय स्तरावरील प्रमुख चेहरा निश्चित करण्यात आलेला नाही. याच मुद्द्यावर उद्धव ठाकरे यांनी बैठकीत भाष्य केल्याचे सांगितले जात आहे.त्यांच्या मते, विविध विचारसरणीचे आणि वेगवेगळ्या राज्यांतील पक्ष एकत्र असताना त्यांच्यात समन्वय साधण्यासाठी एक प्रभावी नेतृत्व आवश्यक आहे. अन्यथा आघाडीचा संदेश जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात.

# सिंगापूर, हाँगकाँगच्या धर्तीवर धारावीचा पुनर्विकास !

## ◆ आधुनिक सुविधा, रहिवासी संकुल, मेट्रो होणार

प्रतिनिधी ९ जून



**मुंबई:** 'सिंगापूर आणि हाँगकाँगमधील आधुनिक गृहनिर्माण प्रकल्पांच्या धर्तीवर धारावीचा पुनर्विकास करण्यात यावा. मात्र, हा प्रकल्प राबविताना धारावीतील नागरिक, त्यांची उपजीविका आणि स्थानिक वैशिष्ट्ये यांना केंद्रस्थानी ठेवण्यात यावे. ठरलेल्या कालावधीतच प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात यावे', असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी येथे दिले. पहिल्या टप्प्यात सन २०२८ पर्यंत किमान दहा हजार घरे नागरिकांना देण्याचे नियोजन करावे अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी केल्या.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात धारावी पुनर्विकास प्रकल्पाची आढावा बैठक झाली. 'धारावीतील संपूर्ण औद्योगिक आणि सामाजिक व्यवस्था कायम ठेवण्यात यावी. व्यावसायिक विकास हा या प्रकल्पाचा एक भाग असला तरी लोकहितालाच सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. त्यांच्या रोजगाराचे संरक्षण करणे आवश्यक आहे', असे त्यांनी स्पष्ट केले. धारावीतील पुनर्वसन इमारतींचे काम ४२ महिन्यांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. पहिल्या टप्प्यातील काम मार्च २०२८ पर्यंत पूर्ण करून हस्तांतरित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

धारावी पुनर्विकास प्रकल्पाचा मास्टरप्लॅन सरकारपुढे सादर करून एक वर्ष उलटला आहे. आतापर्यंत राज्य सरकारकडून या आराखड्याला मान्यता मिळालेली नाही. सोमवारी झालेल्या या आढावा बैठकीत हा प्लॅन मुख्यमंत्र्यांसोमर सादर करण्यात आला. धारावीतली कुंभारवाड्यातील नागरिकांचा या पुनर्विकास प्रकल्पाला विरोध आहे. परदेशी पर्यटकांमध्ये कुंभारवाडा प्रसिद्ध आहे. या परिसराची वेगळी ओळख जपूनच विकास आराखडा तयार केला जाणार आहे. धारावीतील बस आगाराच्या जागेमध्ये रहिवासी आणि व्यावसायिक संकुल उभारणार आहेत. त्याशिवाय धारावीमध्ये मल्टीमोडाल ट्रान्सपोर्ट कॉरिडोर विकसित करण्यात येणार आहे. या भागात अनेक मेट्रो मार्गिकांसह पश्चिम, मध्य आणि हार्बर रेल्वे मार्गांसाठी एक हब तयार केले जाणार आहे. भविष्यात बुलेट ट्रेन स्थानकासोबतही धारावीला जोडण्याची योजना आहे.

# इलेक्ट्रिक बेस्ट बसची वाहनांना धडक ; 1 ठार

## ◆ सहा जखमी, बेस्टकडून चौकशीसाठी समिती

प्रतिनिधी ९ जून

**मुंबई :** धारावी डेपोतून वीर कोतवाल उद्यान (प्लाझा) मार्गे धावणाऱ्या बेस्टच्या इलेक्ट्रिक बसने वाहनांना दिलेल्या धडकेत नियाझ अहमद (२८) या दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला असून इतर सहा जणांवर सायन रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यातील एकाची प्रकृती गंभीर असून इतर पाच जणांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे. सोमवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास हा भीषण अपघात घडला. अपघाताची गंभीर दखल घेत बेस्ट प्रशासनाने वरिष्ठ अधिकाऱ्यांची चार सदस्यीय चौकशी समिती नियुक्त केली असून या समितीला तातडीने अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बेस्ट प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, मार्ग क्रमांक ४६३ वरील बस क्रमांक ७११ (ईव्ही ट्रान्स कंपनीची ओलेक्ट्रा बस) वीर कोतवाल उद्यानातून धारावीकडे जात असताना रस्त्यावर उभ्या असलेल्या क्रेन आणि एका टॅक्सीला धडकली. या अपघातात दोन दुचाकी, एक टॅक्सी आणि एक खासगी टॅक्सीचे नुकसान झाले. अपघातात बसमधील दोन बस निरीक्षक आणि बस वाहक (कंडक्टर) हे देखील जखमी झाले असून त्यांच्यावरही सायन रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जखमींपैकी वृषभ गुप्ता या २२ वर्षीय तरुणाची प्रकृती चिंताजनक आहे. घटनेची माहिती मिळताच वरळी येथील सहायक डेपो व्यवस्थापक, अपघात विभागाचे अधिकारी आणि पर्यवेक्षक कर्मचारी घटनास्थळी तसेच रुग्णालयात दाखल झाले. जखमींना तातडीने वैद्यकीय मदत मिळावी यासाठी प्रशासनाने आवश्यक उपाययोजना केल्याचे बेस्टने म्हटले. अपघातग्रस्त बसचा चालक विकास पडवे (बॅज क्र. ११९४१) हा जानेवारी २०२० पासून वेटलीज ऑपरेटर एसएमटीएपीएलमध्ये कार्यरत होता. मार्च २०२१ पासून तो ईव्ही ट्रान्स (ओलेक्ट्रा) कंपनीत कार्यरत असून इलेक्ट्रिक बस चालविण्याचा त्याला अनुभव असल्याचा बेस्टने स्पष्ट केले.

चालकांना इलेक्ट्रिक बसच्या सुरक्षित संचालनाबाबत नियमित प्रशिक्षण देण्यात येते, असेही सांगण्यात आले. बसचालकाला ताब्यात घेण्यात आले असून, शिवाजी पार्क पोलिस ठाण्यात त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे पोलिस उपायुक्त महेंद्र पंडित यांनी सांगितले.

# गिरगावातील पुनर्विकासाचे धागे मंत्र्यांच्या बंगल्याशी?

## ◆ जागेच्या मालकाला छगन भुजबळांच्या बंगल्यावर बोलावल्याने खळबळ

प्रतिनिधी ९ जून

**मुंबई :** मुंबईसारख्या महानगरात वेगाने होणाऱ्या बांधकामांचा संबंध अनेक राजकारण्यांशी आणि मंत्र्यांशी असल्याच्या चर्चा नेहमीच रंगतात. पण दोन दिवसांपूर्वी गिरगावमधील एका जागा मालकाला थेट मंत्र्यांच्या आवारातील पत्त्यावर नोटीस देऊन जाहीर निमंत्रण दिल्याने त्याचा थेट संबंध प्रस्थापित होतो की काय, अशी चर्चा रंगली आहे. नोटिशीवर मंत्र्यांच्या बंगल्यातील आवाराचा पत्ता देणारी जाहिरात कोणी दिली व त्याचा संबंधित मंत्र्यांशी किंवा त्यांच्या जवळच्या कोणाशी संबंध आहे, का याचा खुलासा झाला नसला तरीही राजकीय वर्तुळात हा चर्चेचा विषय ठरला आहे. याबाबतची चर्चा रंगल्यानंतर सदर विकासकाशी किंवा जाहिरातीशी मंत्री भुजबळ यांचा कसलाही संबंध नसल्याचा खुलासा त्यांच्या कार्यालयाकडून करण्यात आला आहे. 'ही जाहिरात म्हणजे अतिशय गंभीर बाब असून आम्ही याबाबत मलबार हिल पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करणार आहोत. यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल,' असंही भुजबळांच्या कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. गिरगावमधील पुनर्विकासासाठी दुभाष लेनमधील जवळपास १०० वर्षे जुन्या असलेल्या या इमारतीच्या आसपासच्या सर्व इमारती खरेदी केल्यानंतर केवळ एका इमारतीच्या मालकाचा ठावठिकाणा लागत नसल्याने विकासकाने एक जाहिरात दिली. नोटिशीची जाहिरात देताना इमारतीच्या मालकाने थेट मलबार हिलच्या सातपुडा बंगल्याच्या आवारात असलेल्या खोली क्रमांक ४० मध्ये येऊन भेटावे, असे आवाहन केले आहे. या बंगल्यामध्ये सध्या मंत्री छगन भुजबळ यांचे वास्तव्य आहे.

# जूनच्या प्रारंभी मुंबईत पावसाची मोठी तूट !

प्रतिनिधी ९ जून

**मुंबई:** राज्यात मान्सून दाखल झाला तरी मुंबईमध्ये मान्सूनपूर्व सरींचीही फारशी उपस्थिती नाही. पाऊस नसल्याने मुंबईचा पाराही खाली उतरलेला नाही. पावसाच्या अनुपस्थितीमुळे जूनच्या पहिल्या आठवड्यातच मुंबईमध्ये पावसाची मोठी तूट नोंदली गेली आहे. गेल्या वर्षी पहिल्याच आठवड्यात पावसाने सुखद उपस्थिती लावली होती.

राज्यात सोमवारी आणखी काही भागांत पावसाने प्रगती केलेली आहे. तळकोकणातून हर्णे आणि सोलापूरपर्यंत मान्सूनची रेषा पोहोचलेली आहे. मात्र उत्तर कोकणात मान्सूनपूर्व सरींची उणीव असल्याने मान्सून उत्तर कोकणात दाखल झाल्याचे कधी जाहीर होते, याकडे महामुंबईतील नागरिकांचे लक्ष लागलेले आहे. राज्याच्या आणखी काही भागांमध्ये येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये मान्सून दाखल होऊ शकतो, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे.

### गेल्या वर्षीचे चित्र काय?

◆ गेल्या वर्षी मुंबईत १ जून ते ६ जून या कालावधीत कुलाबा येथे ३० मिलीमीटर पावसाची नोंद झाली होती. तर सांताक्रूझ येथे ४७.१ मिलीमीटर पाऊस नोंदला गेला होता. कुलाबा येथे ५ जून रोजी १६ तर सांताक्रूझ येथे ४ जून रोजी २७.१ मिलीमीटर पाऊस पडला होता. मात्र गेल्या वर्षी २६ मे रोजी मान्सून मुंबईत दाखल झाला होता. मुंबईमध्ये २०२३ मध्ये २५ जून रोजी, २०१९ मध्ये २५ जून रोजी तर २०१६ मध्ये २० जून रोजी मान्सून दाखल झाला होता. सन २००१ पासूनच्या नोंदीनुसार सर्वात उशिरा २०२३ आणि २०१९मध्ये मान्सून आगमन झाले होते.

### चक्रीवादळांचा अभाव

◆ पावसाला चालना देणारी मान्सूनपूर्व चक्रीवादळे यंदा अभावाने निर्माण झाली त्यामुळे मान्सूनपूर्व सरीही पडल्या नाहीत. मात्र यंदाची ही स्थिती अद्वितीय आहे का हे तपासण्यासाठी एल निनो ची वर्षे, एल निनो सक्रीय होण्याचा कालावधी आणि मान्सूनपूर्व पाऊसमान तपासावे लागेल असे हवामान अभ्यासक सांगत आहेत.

# युवा संगम कार्यक्रमांतर्गत राज्यपालांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

प्रतिनिधी ९ जून

**मुंबई :** महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी सोमवारी (दि. ८) आंध्रप्रदेशातील विद्यार्थी प्रतिनिधींसोबत 'युवा संगम' कार्यक्रमांतर्गत लोकभवन, मुंबई येथे संवाद साधला. हा कार्यक्रम भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था पुणे तर्फे आयोजित करण्यात आला होता. 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमाचा महत्त्वपूर्ण भाग म्हणून कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी राज्यपालांनी आपल्या भाषणात जबाबदारी, विनम्रता आणि सामाजिक सहभाग या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी विद्यार्थ्यांना विविधतेचा स्वीकार करण्याचे, शिस्त व चिकाटीने काम करण्याचे तसेच व्यावसायिक उत्कृष्टतेसोबत सामाजिक जबाबदारी पार पाडण्याचे आवाहन केले. राज्यपालांनी शिक्षण सुधारणा, कौशल्य विकास, संशोधन आणि आरोग्य क्षेत्रातील प्रगतीचे महत्त्व देखील अधोरेखित केले. त्यांनी शिक्षण मंत्रालय व सहभागी संस्थांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी केंद्रीय उच्च शिक्षण विभागचे उपसचिव श्रेयांश मोहन, भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था (घ्र्ईं) पुणे येथील प्रसार व प्रशिक्षण कार्यक्रम वरिष्ठ तांत्रिक अधिकारी डॉ. मनवा दिवेकर तसेच वरिष्ठ प्रधान तांत्रिक अधिकारी डॉ. शांती कलीपटनपू, तिरुपती येथील भारतीय तंत्रज्ञान संस्थेतील मानव व सामाजिक विज्ञान विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. बिभूती कच्छप, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, राज्यपालांचे सहसचिव एस. रामामूर्ती, आयआयएसईआर येथील प्रसार व प्रशिक्षण कार्यक्रम प्रकल्प व्यवस्थापक नितीन तिवाणे, आंध्रप्रदेशातील विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाचे सदस्य, आयसरचे कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# वानखेडेत अर्जुन तेंडुलकरची अष्टपैलू कामगिरी

## ◆ सामनावीर पुरस्कारही जिंकला



प्रतिनिधी ९ जून

**मुंबई:** टी-२० मुंबई लीग २०२६ चा १६ वा सामना एआरसीएस अंधेरी आणि बांद्रा ब्लास्टर्स यांच्यात खेळला गेला. या सामन्यात अर्जुन तेंडुलकर एआरसीएस अंधेरीकडून खेळला. त्याने फलंदाजी आणि गोलंदाजीत उत्कृष्ट कामगिरी करत प्रतिस्पर्धी संघाला नामोहरम केले. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना अर्जुनने अर्धशतकही झळकावले. त्याची ही खेळी आता चर्चेचा विषय बनली आहे. यापूर्वी, अर्जुन आयपीएल २०२६ मध्ये लखनौ सुपर जायंट्स संघाचा भाग होता, पण त्याला फक्त शेवटचा एकच सामना खेळायला मिळाला. या सामन्यात एआरसीएस अंधेरीने प्रथम गोलंदाजी केली. कर्णधार शिवम दुबेने अर्जुन तेंडुलकरवर विश्वास दाखवला आणि त्याने अप्रतिम गोलंदाजी केली. अर्जुनने तीन षटकांत केवळ ११ धावा देत तीन फलंदाजांना बाद केले. त्याचा इकॉनॉमी रेट ३.७० होता. त्याच्या भेदक गोलंदाजीमुळे बांद्रा संघाचे फलंदाज अस्वस्थ झाले आणि त्यांना मोठी धावसंख्या उभारण्यात अपयश आले. यानंतर अर्जुनने फलंदाजीची सूत्रे हाती घेतली आणि एक शानदार अर्धशतक झळकावले. त्याने मुशीर खानसोबत शतकी भागीदारीही केली. अंधेरीकडून मुशीर खानने ३८ चेंडूंमध्ये नाबाद ५४ धावा केल्या, तर अर्जुन तेंडुलकरने ३४ चेंडूंमध्ये ६६ धावा केल्या. त्याने १९४.१२च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी केली. अर्जुनने ४ चौकार आणि ५ षटकार मारले. अष्टपैलू कामगिरीबद्दलअर्जुनला सामनावीर पुरस्कार मिळाला.

प्रथम फलंदाजी करताना, वांद्रे संघाने २० षटकांत ९ गडी गमावून १४४ धावा केल्या. संघातील कोणत्याही फलंदाजाने विशेष प्रभाव पाडला नाही. ९ व्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या सागर छाब्रियाने २३ चेंडूंमध्ये ४४ धावा केल्या आणि ओम केशकमतने ३६ चेंडूंमध्ये ४९ धावा केल्या. लक्ष्याचा पाठलाग करताना, अंधेरीने १३.४ षटकांत १४८/१ धावा करून सामना जिंकला. सामन्यातील आपल्या प्रभावी कामगिरीनंतर अर्जुन म्हणाला, 'अशी कामगिरी कोणाला आवडणार नाही? संघासाठी चांगली कामगिरी करणे नेहमीच चांगले असते. मी चांगली गोलंदाजी केली आणि विकेट घेतली.

मी फक्त योग्य ठिकाणी गोलंदाजी करण्याचा प्रयत्न करतो आणि जर मला विकेट मिळाली, तर ते उत्तमच असते. मी धावा रोखण्याचाही विचार करतो. मी स्वतःला अष्टपैलू मानतो. मला कोणत्याही क्रमांकावर फलंदाजी करायला आवडते. संघ मला ज्या क्रमांकावर फलंदाजी करायला सांगेल, मी त्या क्रमांकावर फलंदाजी करेन.'

# करोनात घर विकलं पण बायको ठरली खमकी

## ◆ अंशुमन विचारेने सांगितला तिसऱ्या घराचा किस्सा

प्रतिनिधी ९ जून

**मुंबई :** अभिनेता अंशुमन विचारे याने काही दिवसांपूर्वीच तिसरे घर खरेदी केले. मध्यंतरीच्या काळात त्याने कामातून पूर्ण ब्रेक घेतलेला. या वेळी बायकोने कसा पाठिंबा दिला हे त्याने उघड केले.

अभिनेता अंशुमन विचारे हा गेले काही दिवस त्यांनी घेतलेल्या तिसऱ्या घरासाठी चर्चेत आहे. अनेकदा कलाकार आपल्या आयुष्यातले सुखाचे क्षण सोशल मीडियावर शेअर करत असतात. अभिनेता अंशुमन विचारे यांनी सुद्धा काही दिवसांपूर्वीच त्याने तिसरं घर घेतल्याचं सांगितलं. तेव्हापासून या घराची चाहत्यांमध्ये उत्सुकता होते. एवढं कसं मॅनेज होतं, एवढी इन्वेस्टमेंट कशी असते हे अनेक प्रश्न सोशल मीडियावर विचारले गेले. यावर अंशुमननेच त्याच्या तिसऱ्या घराचा किस्सा शेअर केला आहे

नुकत्याच एका मुलाखतीमध्ये अंशुमन विचारे म्हणाला की, 'माझं पहिलं घर होतं काजूपाड्यात जे माझ्या वडिलांच होतं. त्यानंतर मी स्वत:च्या पैशाने गोराईत माझं पहिलं घर घेतलं. सीवडूच्या मागे होतं ते. त्यावेळी माझं



सगळं छान चाललेलं. इव्हेंट्स वगैरे चालू होते त्यामुळे पैसेही भरपूर मिळत होते. त्या पैशाने मी पुण्यात पिंपरी चिंचवड इथल्या सांगवी येथे दुसरं घर घेतलं. तो मोठा फ्लॅट होता. मग करोना सुरू झाला. त्यावेळी आमचं बबनचं शूट चालू झालं होतं. मी फॅमिली सोडून जाणार नव्हतो. तेव्हा माझ्या मनात कुठेतरी जाणीव झाली की आपण जे काही स्किट वगैरे करतोय, रिअलिटी शो करतोय त्यावरुन एक्सपायरी डेटकडे येत चाललो आहोत. आपल्याकडून तेच तेच काम होतय. मला थांबायला हवं असा विचार करुन मी ब्रेक घेतला.' अंशुमनने पुढे सांगितलं की, 'मी याचं क्रेडिट माझ्या बायकोला देईन कारण मी तिला म्हटलं की हे बघ मी ब्रेक घेतोय, करोना सुरू आहे, आपल्या पुण्यातल्या घराचे हप्ते जायचे आहेत. त्यावेळी ४८००० रुपये महिन्याचा हप्ता जायचा. त्यावर ती म्हणाली काही हरकत नाही. तुला नाही करायचय ना मग तू थांब, आपण मस्त आमटी भात खाऊ, खिचडी भात खाऊ मला काही प्रोब्लेम नाही पण छान काम कर. त्यावेळी माझा सगळा वेळ माझ्या मुलीला दिला. ती त्यावेळी एक दिड वर्षांची होती.'

'पण नंतर असं झालं की मी एक दीड वर्ष काहीच काम करत नव्हत. छोटं मोठं तरी काहीतरी करायचो. करोना मध्ये क्वारंटाइन शूट केलं. मात्र त्यामुळे माझ्या हप्त्याची गणित बिघडायला लागली. त्यामुळे जबरदस्ती ते पुण्याचं घर विकावं लागलं. ते घर विकल्याचं मला खूप वाईट वाटलं कारण खूप छान घर बनवलेलं ते. पुढे करोना संपल्यावर २ वर्षांनी मी ठाण्याला शिफ्ट होण्याचा निर्णय घेतला. ठाण्याचं कल्चर, तिथलं वातावरण मला खूप आवडतं. त्यामुळे मग गोराईचं घर काढून मी हे घर घेतलं. असं हे माझं तिसरं घर आहे.' एका मुलाखतीत अभिनेत्याने हा किस्सा सांगितला आहे.

# तुमच्या पीएफ खात्यात नाव, जन्मतारीख चुकलीये का? काळजी नको, घरबसल्या करा झटपट दुरुस्ती

प्रतिनिधी ९ जून

**मुंबई :** नोकरदार वर्गासाठी भविष्य निर्वाह खाते अत्यंत महत्त्वाचे आहे. परंतु, पीएफ खात्यावरील नाव आणि आधार कार्डमधील माहिती मॅच न झाल्यास पैसे काढताना मोठी अडचण येऊ शकते. ही समस्या सोडवण्यासाठी ईपीएफओने आता ऑनलाईन दुरुस्तीची सोपी सुविधा दिली आहे. सरकारी कार्यालयाचे चकरा न मारता, तुम्ही घरबसल्या अवघ्या काही मिनिटांत नावात बदल करू शकता. नाव किंवा जन्मतारीख चुकल्यामुळे तुमचा पीएफ फंड अडकला आहे का? चिंता करू नका. पीएफ खात्यातील ही चूक सुधारणे आता अगदी सोपे झाले आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या नवीन ऑनलाईन प्रक्रियेमुळे नोकरदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. मोबाईल किंवा कॉम्प्युटरवरून ही दुरुस्ती कशी करावी, याची टेप-बाय-स्टेप सोपी माहिती जाणून घ्या. नोकरदार वर्गासाठी भविष्य निर्वाह निधी म्हणजेच इइ खाते अत्यंत महत्त्वाचे असते. अनेकदा PF खात्यावरील नाव किंवा जन्मतारीख आधार कार्डशी मॅच न झाल्यामुळे पैसे काढताना किंवा इइ ट्रान्सफर करताना मोठ्या अडचणी येतात. तुमच्याही इइ खात्यात अशी चूक झाली असेल, तर आता सरकारी ऑफिसच्या फेऱ्या मारण्याची अजिबात गरज नाही. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने (EPFO) ही प्रक्रिया अत्यंत सोपी केली असून तुम्ही ऑनलाईन पद्धतीने अवघ्या काही मिनिटांत दुरुस्तीची विनंती पाठवू शकता.

**ऑनलाईन नाव दुरुस्त करण्याची सोपी स्टेप-बाय-स्टेप प्रोसेस**

लॉगिन करा: सर्वप्रथम EPFO च्या अधिकृत सदस्य पोर्टलला भेट द्या आणि तुमचा UAN नंबर आणि पासवर्ड टाकून लॉगिन करा. पर्याय निवडा: होम पेजवर आल्यानंतर वर दिलेल्या मेन्यूमधील 'Manage' या टॅबवर क्लिक करा आणि त्यानंतर 'Joint Declaration' efkeâbkee 'Modify Basic Details' हा पर्याय निवडा.

माहिती भरा: आता तुमच्या स्क्रीनवर आधार कार्डनुसार योग्य नाव, जन्मतारीख किंवा इतर तपशील भरण्याचा पर्याय दिसेल. तिथे अचूक माहिती टाईप करा.

ओटीपी पडताळणी: माहिती भरून झाल्यावर 'Update Details' वर क्लिक करा. तुमच्या आधार लिंक असलेल्या मोबाईल नंबरवर एक ओटीपी (OTP) येईल, तो टाकून सबमिट करा.

**बदल कधी लागू होतो?**

तुम्ही ऑनलाईन विनंती सबमिट केल्यानंतर, ती मंजुरीसाठी प्रथम तुमच्या कंपनीकडे (ईंज्त्दबे) जाते. कंपनीने डिजिटल स्वाक्षरीने मान्यता दिल्यानंतर ती इंइध ऑफिसकडे पाठवली जाते.

# हवामानात बदल आणि तापमान वाढ चिंताजनक

प्रतिनिधी ९ जून

**मुंबई :** अतोनात वृक्षतोड चिंताजनक बाब झाली आहे. वृक्षतोड हा आजच्या काळातील एक अत्यंत गंभीर आणि चिंताजनक विषय आहे. मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी आणि कथित विकासासाठी मोठ्या प्रमाणावर जंगले नष्ट केली आहेत. याचे निसर्गावर आणि मानवी जीवनावर झालेले परिणाम अत्यंत भयानक आहेत.

हवामान बदल आणि जागतिक तापमान वाढ कळीचा मुद्दा आहे. ?कार्बन डायऑक्साइडचे वाढते प्रमाण: झाडे हवेतील कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि आपल्याला ऑक्सिजन देतात. झाडेच नष्ट झाल्यामुळे हवेतील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण प्रचंड वाढले आहे.

यामुळे 'ग्रीनहाऊस इफेक्ट' निर्माण होऊन जागतिक तापमानात सातत्याने वाढ होत आहे.

?मान्सूनचे बदलते चक्र आणि दुष्काळ

?अनियमित पाऊस: झाडे बाष्पीभवनाच्या प्रक्रियेत मदत करतात, ज्यामुळे ढग निर्माण होतात. वृक्षतोडीमुळे पावसाचे प्रमाण कमी झाले आहे आणि मान्सूनचे चक्र पूर्णपणे बिघडले आहे. दुष्काळ आणि पाण्याचे दुर्भिक्ष: वेळेवर पाऊस न पडल्यामुळे अनेक भागांत तीव्र दुष्काळाची परिस्थिती निर्माण होते, ज्यामुळे भूजल पातळी खालावली आहे.

**जैवविविधतेचा ऱ्हास**

वन्यजीवांचे आश्रयस्थान नष्ट: जंगले हे लाखो पशु-पक्षी आणि कीटकांचे नैसर्गिक घर आहे. वृक्षतोडीमुळे त्यांचे आश्रयस्थान नष्ट झाले असून अनेक दुर्मिळ प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. मानव-वन्यजीव संघर्ष: राहण्यासाठी जागा आणि खाण्यासाठी अन्न न मिळाल्यामुळे बिबट्या, वाघ किंवा हत्ती यांसारखे हिंस्र प्राणी मानवी वस्त्यांमध्ये घुसत आहेत, ज्यामुळे दोन्ही बाजूंचे नुकसान होत आहे. ४. जमिनीची धूप आणि सुपीकता कमी होणे माती वाहून जाणे: झाडांची मुळे माती घट्ट धरून ठेवतात. झाडे नसल्यामुळे मुसळधार पावसात किंवा वाऱ्यामुळे जमिनीचा सुपीक थर वाहून जातो जमीन नापीक होणे: जमिनीची धूप झाल्यामुळे शेतीची सुपीकता कमालीची घटते, ज्याचा थेट परिणाम अन्नधान्य उत्पादनावर होतो. ५. नैसर्गिक आपत्तींमध्ये वाढ पूर परिस्थिती: झाडे पाण्याचा वेग कमी करतात आणि पाणी जमिनीत जिरवण्यास मदत करतात. डोंगराळ भागातील वृक्षतोडीमुळे पाणी थेट खाली येते, ज्यामुळे अचानक पूर येणे आणि दरडी कोसळणे यांसारख्या दुर्घटना वाढल्या आहेत. ६. आरोग्य आणि प्रदूषणाच्या समस्या हवेची खालावलेली गुणवत्ता: झाडे हवेतील धूलिकण आणि विषारी वायू शोषून हवा शुद्ध ठेवतात. त्यांच्या अभावामुळे हवेचे प्रदूषण वाढून श्वसनाचे आजार, दमा आणि इतर गंभीर आजार वाढले आहेत. नवीन आजारांचा प्रादुर्भाव: जंगले नष्ट झाल्यामुळे वन्यजीवांच्या संपर्कात आल्याने प्राण्यांमधून मानवात पसरणाऱ्या नवीन व्हायरस आणि आजारांचा धोका वाढला आहे.

**थोडक्यात सांगायचे तर...**

वृक्षतोड म्हणजे मानवाने स्वतःच्या पायावर मारून घेतलेली कुऱ्हाड आहे. जर आपण आताच 'झाडे लावा, झाडे जगवा' हा संदेश प्रत्यक्षात आणला नाही, तर येणाऱ्या पिढ्यांना शुद्ध हवा आणि पाण्यासाठीही संघर्ष करावा लागेल.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ■ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ■ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135